## राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती: [वरिष्ठ महाविद्यालयीन]

शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग, मुंबई क्र. एससीएच-१०६३ यु. दि. ४ जून, १९६४ व दि. १६ नोव्हें., १९६४ अन्वये राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आलेली आहे.

राज्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते.

१) योजनेचे नाव : खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

२) संच संख्या : या योजनेकरिता एकूण १२०८ संच मंजूर आहे. त्यांपैकी २३० संच वाणिज्य शाखेसाठी व ५५ संच विधी शाखेसाठी राज्यस्तरावर मंजूर असून उर्वरीत ९२३ संचापैकी २/३ संच विज्ञान शाखेसाठी व १/३ संच कला शाखेसाठी मंजूर आहे. सदर संचांची विभागणी शिक्षण मंडळाच्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस बसलेल्या विद्यार्थी संख्येच्या आधारे केली जाते.

३) शिष्यवृत्तीचा दर : या शिष्यवृत्तीचा दर रु. १००/- द.म. हा शा. नि. ५ २ २००४ नुसार सुधारित केलेला आहे. नवीन मंजुरी १० महिन्यांकरिता व नूतनीकरण १२ महिन्यांकरिता दिले जाते.

४) पात्रता : इ. १२वीच्या परीक्षेत किमान ६०% गुण प्राप्त असणे आवश्यक आहे.

५) अर्ज कोठे मिळतो : संबंधित शिष्यवृत्तीचे अर्ज सर्व अकृषि विद्यापीठाकडून त्याच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांना पाठविले जातात.

६) अर्ज कोणामार्फत, कोणाच्या नांवे पाठवावयाचा : संबंधित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज भरून शिक्षण संचालक [उच्च शिक्षण], १७, डॉ. आंबेडकर रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ या कार्यालयाकडे नवीन मंजुरीकरिता पाठविण्यात यावेत. संबंधित पात्र विद्यार्थ्यांना नवीन मंजुरी या संचालनालयाकून दिली जाते.

७) अर्ज स्वीकृतिचा अंतिम दिनांक : या कार्यालयाकडे अर्ज पाठविण्याची अंतिम मुदत ३० सप्टें., नमूद केलेली असते व तसे परिपत्रक सर्व विद्यापीठांना पाठविले जातात.

८) नवीन मंजूरी/नूतनीकरण : खुली गुणवत्ता नवीन मंजुरी या संचालनालयाकडून केली जाते व नूतनीकरण संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावरून मंजूर केले जाते.